प्रेस नोट दिनांक १७/१०/२०२२

**महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, बारवी धरण विभाग अंबरनाथ जि. ठाणे येथील उप कार्यकारी अभियंता यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले बाबत,**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपच प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद कमांक | :- | अंबरनाथ पोलीस ठाणे दैनंदिनी नोंद कमांक ४२/१५:४६ दिनांक १७/१०/२०२२ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | श्री. संजय नथूराम माने, वय ५५ वर्ष, उप कार्यकारी अभियंता, (वर्ग १) महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, बारवी धरण विभाग अंबरनाथ जि. ठाणे |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ७८,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ५०,०००/- लाचेची मागणी |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू. ५०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार हे सिव्हील कॉन्ट्रॅक्टर ची कामे करतात. त्यांनी बारवी धरण येथील विश्रामगृहाची, तसेच उपविभागीय कार्यालयाची साफसफाई व देखभाल करणे ईत्यादी कामाचे कॉन्ट्रक्ट घेतले आहे. सदर टेडंरचे बिलात कोणतीही त्रुटी न काढता रक्कम रू. २,२०,३२६/- किमंतीचे बिल मंजूर करण्याकरीता बक्षिस म्हणून तसेच कॉन्ट्रक्टचे वेळी घेतलेली अनामत रक्कम परत देण्याकरीता लोकसेवक श्री. संजय माने हे रू.७८,०००/-लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १४/१०/२०२२ रोजी अे.सी.बी. नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br><br>प्रस्तुत तकारीच्या अनुषंगाने दिनांक १७/१०/२०२२ रोजी शासकीय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. संजय नथूराम माने यांनी तकारदार यांचेकडे मंजूर झालेल्या रू. २,२०,३२६/-किंमतीचे बिलात बक्षिस म्हणून व तक्रारदार यांनी भरलेले सुरक्षित अनामत रक्कम परत देण्याकरीता लोकसेवक श्री. संजय माने यांनी रू. ७८,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ५०,०००/- स्विकारण्याचे कबूल केले. सापळा कारवाई दरम्यान रू. ५०,०००/- लाचेची रक्कम त्यांच्या कार्यालयात स्विकारले असता लोकसेवक श्री. संजय माने यांना १२:५३ वाजता रंगेहाथ पकडण्यांत आले आहे. |

**मार्गदर्शनअधिकारी :**

**१)मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले सो. अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग ठाणे शहर तथा पोलीस अधीक्षक(अति.कार्य.) ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**२)श्री.अनिल घेरडीकर सो.अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शनब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

---

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका विरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

**संपर्कपत्ता** :-ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणेपश्चिम, ४००६०१

संकेतस्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई-मेल :-spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईनतक्रार

ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net

टोलफ्रीनं. :-१०६४

दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४

व्हॉटस्ॲप क्र. :-९९३०९९७७००

शिवराज बेंद्रे
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई

Scanned with CamScanner